# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक २५.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २४/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ०४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी कायद्याखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २४/१०/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन २.८८ लिटर दारू असा एकुण १,१२२/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अपघात** :— दिनांक 24/10/2022 रोजी फिर्यादी प्रफुल विठ्ठलराव सुर्यवंषी वय 28 वर्ष व्य.मजुरी रा.जिजामाता नगर यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली षहर येथे कलम 279,337,338,427 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन 23.10.22 रोजीचे 22:00 वा चे सुमारास खटकाळी बायपास हिंगोली दक्षिणेस आरोपीने त्याचे ताब्यातील पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर कार भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी व त्याचा मित्र यांस जोराची धडक देवुन गंभीर जख्मी केले व मुक्का मार लागला आहे व बाजुला फिर्यादीचे उभी असलेली मोटार सायकलला पण धडक देवुन नुकसान केले म्हणुन गुन्हा. दाखल होवुन या संदर्भात नर्सी ना.पोलीस तपास करित आहेत.